**रयत शिक्षण संस्थेचे,**

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)

## (घटक महाविद्यालय: कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा)

## विद्यार्थिनी वसतिगृह समिती वार्षिक अहवाल २०२३-२४

- सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये कमवा व शिका योजनेच्या २१ व इतर १५६ अशा १७७ विद्यार्थींनीनी प्रवेश घेतला.
- दिनांक १८ ऑक्टोबर,२०२३ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह समिती आणि महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यामाने बॅरी. पी. जी. पाटील सभागृह (हॉल नं.१४) येथे 'महिलांविषयक कायदे आणि सायबर क्राईम' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख साधन व्यक्ती म्हणून सातारा पोलीस स्टेशन येथील महिला पोलीस कॉन्स्टेबल नीलम सूर्यवंशी यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनीसाठी कायद्यांचे महत्व विषद करून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आयोजित करावयाच्या उपक्रमाबद्दल उपयुक्त सूचना दिल्या.
- दिनांक ०४ जानेवारी २०२४ रोजी श्रीमती राजश्री चिंचकर यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.
- दिनांक ०४ जानेवारी २०२४ रोजी श्रीमती मृणालिनी मिलिंद यांनी विद्यार्थिनींना 'स्त्री-पुरुष समानता' या विषयावर मार्गदर्शन केले.
- दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी श्रीमती जास्मिन पटेल व रेश्मा सोनवले यांनी विद्यार्थिनींना निर्भया पथक याविषयी माहिती देऊन विद्यार्थिनींमध्ये शौर्य, धाडस व निर्भयपणा निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली.
- दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह समिती आणि हेल्थ सेंटर, छ.शिवाजी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यामाने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने लेजर प्लेस येथे मोफत आरोग्यविषयक तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- विद्यार्थिनी वसतिगृह समितीच्या वतीने दरवर्षी होस्टेल डे च्या निमित्ताने विविध कलागुणदर्शन कार्यक्रम व संगीत खुर्ची स्पर्धा, लिंबू-चमचा स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात येते. दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांच्या हस्ते रस्सीखेच स्पर्धेचे उदघाटन करून या स्पर्धेला मोठया उत्साहात सुरुवात झाली. याच दिवशी संगीत खुर्ची स्पर्धा व विद्यार्थिनींच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- दिनांक २७ जानेवारी २०२४ रोजी लिंबू-चमचा स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. रस्सीखेच स्पर्धा समन्वयक म्हणून विद्यार्थिनी कु. अनुजा पोरे, संगीत खुर्ची स्पर्धा समन्वयक म्हणून विद्यार्थिनी कु. प्राजक्ता माळी, क्रिकेट स्पर्धा समन्वयक म्हणून कु. सानिका शिंदे तर प्रश्नमंजुषा स्पर्धा समन्वयक म्हणून विद्यार्थिनी कु. सायली माने यांनी उत्कृष्टरित्या कामगिरी पार पाडली. या संपूर्ण स्पर्धांचे समन्वयक म्हणून विद्यार्थिनी कु. मनाली किणीकर हिने यशस्वीरीत्या संयोजन केले. या सर्व स्पर्धांमध्ये वसतिगृहातील बहुसंख्य विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

- दिनांक २८ जानेवारी,२०२४ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह येथे 'होस्टेल डे' निमित्त विविध कलागुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव साहेब तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब उपस्थित होते. या कार्यक्रमाचे परिक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून डॉ. सौ. पी. के. घाटगे व डॉ. संजयकुमार सरगडे यांनी कामकाज पाहिले. प्रा. चिंदे एम. डी. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रम आयोजनापाठीमागचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थिनी वसतिगृह रेक्टर श्रीमती जुई ढवळे यांनी मागील वर्षीच्या वसतिगृह अहवालाचे वाचन केले. प्रमुख मान्यवरांच्या सत्कार समारंभानंतर प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी विद्यार्थिनींना आपल्या विविध कला सादर करण्यासाठी शुभेच्छा दिल्या व मुख्य कार्यक्रमानंतर सर्व सहभागींचे कौतुक करून शाबासकीची थाप दिली. मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी वसतिगृह समितीच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये विद्यार्थिनींनी सहभाग घेवून आपले व्यक्तिमत्व विकास साधण्याचा शुभसंदेश दिला. विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या निमित्ताने श्रीमती भाग्यश्री जाधव व श्रीमती अनिता मोरे यांची विशेष उपस्थिती होती. शिवाय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रामराजे माने देशमुख, वसतिगृह समितीमधील सदस्य डॉ. के. व्ही. नलावडे, डॉ. व्ही. एम. माने, प्रा. सौ. आसावरी शिंदे, प्रा. सौ. उषा घाडगे यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. ऋतुजा पाटील, कु.श्वेता पाटील व कु. निकिता बिरंबोले यांनी केले. माजी संस्कृत विभाग प्रमुख डॉ. अराणके मॅडम यांच्या आर्थिक सहकार्यातून वसतिगृहातील विद्यार्थिनींना भोजनाची व्यवस्था करण्यात आली. 'होस्टेल डे' कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. चिंदे एम. डी. यांनी कामकाज पाहिले.
- दिनांक ०२ एप्रिल ते ०८ एप्रिल २०२४ या कालावधीत रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थिनींना पौष्टीक आहाराचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचा शुभारंभ रयत शिक्षण संस्थेचे संघटक आदरणीय डॉ. अनिल पाटील साहेब यांच्या हस्ते विद्यार्थिनींना खाऊ वाटप करून करण्यात आला. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थिनींच्या एच. बी. वाढीसाठी या सप्ताहात सर्व मुलींना गुळ-शेंगदाणे, बेदाणा, खजूर, राजिगरा लाडू, केळी, शेंगदाणा चिक्की या सकस व पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले.
- या शैक्षणिक वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. शिवाय विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख, उपप्राचार्य प्रो. (डॉ.) अनिलकुमार वावरे, उपप्राचार्य डॉ. रामराजे माने देशमुख, प्रा. गणेश पाटील उपप्राचार्य (ज्यू.), श्री. सपकाळ टी. के.(कार्यालयीन प्रमुख) यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थिनी वसतिगृह रेक्टर श्रीमती जुई ढवळे, प्रा. चिंदे एम. डी., विद्यार्थिनी वसतिगृह समितीमधील डॉ. के. व्ही. नलावडे, डॉ. व्ही. एम. माने व ज्युनिअर विभागातील प्रा. आसावरी शिंदे, प्रा. उषादेवी घाडगे या सर्व सदस्या, विद्यार्थिनी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनी आणि प्रशासकीय सेवक यांच्या विशेष सहकार्यातून वर्षभरातील वसतिगृहाचे कामकाज यशस्वीरीत्या पूर्ण करता आले.



**‘होस्टेल डे’ निमित्त रस्सीखेच स्पर्धेचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब, वसतिगृह प्रमुख प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख व इतर मान्यवर**



**विद्यार्थिनी क्रिकेट संघासमवेत मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब, रेक्टर श्रीमती जुई ढवळे व प्रा. चिंदे एम. डी.**



**‘विविध कलागुण दर्शन’ कार्यक्रम प्रसंगी मा.प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व इतर मान्यवर**




**रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पांजली अर्पण करताना सर्व विद्यार्थिनी**



**विद्यार्थिनींना सकस व पौष्टिक आहार वाटप कार्यक्रम शुभारंभ करताना**
**रयत शिक्षण संस्थेचे संघटक मा. डॉ. अनिल पाटील साहेब समवेत मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व विद्यार्थिनी**




**विद्यार्थिनींना सकस व पौष्टिक आहार वाटप करताना**
**वसतिगृह समिती प्रमुख प्रो. (डॉ.) रोशन आरा शेख समवेत डॉ. के. व्ही. नलावडे व रेक्टर जुई ढवळे**